# GOD'S SIMPLE PLAN OF SALVATION

## Introduction

I जॉन 5:13 जे देवाच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवतात त्यांना मी या गोष्टी लिहीत आहे, यासाठी की, तुम्हाला अनंतकाळचे जीवन आहे, याविषयी तुम्ही निश्चिंत असावे,

## I आम्ही सर्वांनीच पाप केले आहे. आम्ही सर्वांनीच अशा गोष्टी केल्या आहेत ज्या भगवंताला प्रिय नाहीत. निरागस असा कोणीच नाही. रोमन्स

रोमन्स 3:10 शास्त्रात असे लिहिले आहे: "पापाशिवाय असा कोणीही नाही. एकही नाही.

रोमन्स 3:23 सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत.

रोमन्स 5:12 म्हणून पाप जसे एका मनुष्याद्वारे, जगात आले आणि पापाद्वारे मरण आले, तसेच सर्वांनी पाप केल्यामुळे सर्व माणसांमध्ये मरण आले.




## II आम्हांला पापाच्या दुष्परिणामांची शिकवण देते -

रोमन्स 6:23 कारण पापाची मजुरी मरण आहे. परंतु देवाची ख्रिस्त येशूमध्ये दिलेली मोफत देणगी म्हणजे अनंतकाळचे जीवन आहे.

Revelation 21:8 परंतु भित्रे, विस्वास न ठेवणारे अंमगळ, खुनी, व्यभिचारी, (म्हणजे लैंगिक अनीतीने वागणारे लोक), चेटकी, मूर्तिपूजा करणारे आणि सर्व खोटे बोलणारे अशा सर्वांना अग्नीने व गंधकाने धगधगणाऱ्या तळ्यामध्ये जागा मिळेल. हे दुसरे मरण आहे.”

## III येशू ख्रिस्ताने आमच्यासाठी मरण पत्करले. येशूच्या मरणाने आमच्या पापांसाठी मोल चुकते केले. येशूचे पुनरुत्थान सिद्ध करते की भगवंताने आमच्या पापांचे मोल म्हणून येशूचे मरण मान्य केले.

रोमन्स 5:6 आम्ही जेव्हा आमचे स्वत:चे तारण करण्यासाठी अशक्त होतो तेव्हा ख्रिस्त योग्य वेळी आमच्यासाठी मरण पावला.

रोमन्स 5:8 परंतु आम्ही पापी असतानाच ख्रिस्त आमच्यासाठी मरण पावला. त्याद्वारे त्याने दाखवून दिले की, तो आमच्यावर फार प्रेम करतो.

रोमन्स 14:9 ख्रिस्त मेला आणि जिवंत झाला यासाठी की त्याने जे आता मेलेले आहेत आणि जे अजूनही जिवंत आहेत त्या दोघांचा प्रभु व्हावे.

रोमन्स 6:23 कारण पापाची मजुरी मरण आहे. परंतु देवाची ख्रिस्त येशूमध्ये दिलेली मोफत देणगी म्हणजे अनंतकाळचे जीवन आहे.



**Christ died for sinners!**

## IV आम्ही स्वतःला वाचवू शकत नाही.

Acts 4:12 येशू हा एकमेव आहे जो लोकांना तारु शकेल. त्याचे नाव हेच सामर्थ्य फक्त जगामध्ये आहे जे लोकांना तारण्यासाठी दिले आहे, आमचे तारण येशूद्वारे झालेच पाहिजे!"

एफिसियन्स 2:8-9 कारण देवाच्या कृपेने विश्वासाच्या द्वारे तुमचे तारण झाले आणि ते तुमच्याकडून झाले नही, तर ते देवापासूनचे दान असे आहे. आणि एखादा काही काम करतो त्याचा परिणाम म्हणून नव्हे. यासाठी कोणी बढाई मारु नये.

Titus 3:5 त्याने आम्हाला तारले. देवाकडून निर्दोष म्हणवून घेण्यासाठी आम्ही केलेल्या कोणत्याही कृत्यांनी नव्हे तर त्याच्या दयेमुळे आम्ही तारले गेलो आणि ते आमच्याकडे नव्या जन्माच्या स्नानाद्वारे आम्ही नवीन जन्म पावलो आणि पवित्र आत्म्याद्वारे प्राप्त झालेले नवीकरण यांनी तारले गेलो.




## V आमच्या जागी येशूच्या मरणामुळे आम्हांला सर्व जे करायचे आहे ते म्हणजे त्याच्यामध्ये श्रद्धा ठेवणे, त्याचे मरण म्हणजे आमच्या पापांचे मोल अशी श्रद्धा बाळगणे – आणि आमचे रक्षण होईल ! रोमन्स

रोमन्स 4:24 तर आपल्यासाठीसुद्धा होते, ज्याने आपल्या प्रभु येशुला मेलेल्यांतून उठविले आपण त्याच्यावर विश्वास ठेवतो,

रोमन्स 10:9-10,13 की, जर तू तुझ्या मुखाने "येशू प्रभु आहे" असा विश्वास धरतोस आणि आपल्या अंत:करणात देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा विश्वास धरतोस तुझे तारण होईल कारण नीतिमत्वासाठी मनुष्य अंत:करणाने विश्वास ठेवतो आणि तारणासाठी विश्वासाने कबूल करतो. कारण "जे कोणी प्रभूचे नाव घेऊन हाक मारतील, त्यांचे तारण होईल."

ईश्वरी कृपेने आणि देवाच्या दयाळूपणामुळे मिळवू शकता. जर तुम्ही जिझस ख्राईस्टला तुमचा रक्षणकर्ता मानत असाल आणि देवाकडून क्षमा मिळवत असाल, तर इथे प्रार्थना आहे जी तुम्ही करू शकता. ही किंवा दुसरी कुठली प्रार्थना म्हणून तुमचे रक्षण होणार नाही. जिझस ख्राईस्ट मध्ये विश्वास ठेवूनच तुमच्या पापांच्या क्षमेची तजवीज होऊ शकेल. ही प्रार्थना म्हणजे केवळ तुमचा देवावर असलेला विश्वास आणि तुमच्या क्षमेची तजवीज केल्या बदल त्याचे आभार व्यक्त करण्याचा मार्ग आहे.

"हे देवा,

मला माहीत आहे मी तुझ्या विरुध्द पाप केले आहे आणि मी शिक्षेला पात्र आहे. पण ज्या शिक्षेला मी पात्र आहे ती शिक्षा जिझस ख्राईस्टने भोगली कारण की त्याच्यावर असलेल्या विश्वास मुळे मला क्षमा मिळू शकते. मी माझ्या पापां पासून बाजूला झालो आणि मोक्षासाठी माझा विश्वास त्याच्यावर ठेवला. तुमच्या आश्चर्यकारक कृपेसाठी आणि क्षमेसाठी आभारी आहे! आमिन!"